अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर


## बाजार समितीची निवडणूक विधानसभेनंतरच होणार

### सहकार व पणन विभागाचे आदेश

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर बाजार समितीची निवडणूक ३१ डिसेंबरनंतर होणार असल्याचे आदेश सहकार व पणन विभागाच्या वतीने आलेल्या आदेशात नमूद केले आहे. म्हणजेच विधानसभा निवडणूक नंतरच निवडणूक होणार हे स्पष्ट झाले आहे.



सोलापूर बाजार समितीच्या संचालक पदासाठी पहिल्या दिवशी १८१ अर्ज विक्री झाल्याचे सहहायक दुय्यम निबंधक आबासाहेब गावडे यांनी सांगितले आहे. सोलापूर आणि बार्शी बाजार समितीसाठी सोमवारपासून अर्ज विक्री सुरू झाली. दुपारी ३ वाजेपर्यंत विविध इच्छुकांनी १८१ अर्ज घेतले. यामध्ये अडते, व्यापारी, राजकिय पदाधिकारी, आजी माजी संचालकांनी अर्ज घेतले आहेत.११ तारखे पर्यंत दुपारी ३ पर्यंत विक्री होणार आहे. आलेल्या आदेशानुआर आहे तशी प्रक्रिया थांबवण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.



# तुझ्या गळा-माझ्या गळा,गुंफल्या 'एकी'च्या माळा

## आ.बबनदादा शिंदे फॅमिलीने आवळली एकजुटीची वज्रमूठ

कुर्डूवाडी-करमाळा/प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात राजकीय हालचालींना वेग आहे.विद्यमान आमदारांकडून आपली प्रतिष्ठ पणाला लावली जात आहे. बदलत चाललेले राजकीय वातावरण पाहून सर्वच आमदार रणनीती ठरवत आहे.सोलापूर जिल्ह्याचे अधिक लक्ष माढा विधानसभा मतदार संघावर आहे. विद्यमान आमदार बबनदादा शिंदे यांची विरोधकांकडून कोंडी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.मात्र शिंदे फॅमिलीने सोमवारच्या एका कार्यक्रमात एकीची वज्रमूठ आवळल्याने विरोधकांचे धाबे दणाणले आहे.**



**कुर्डूवाडी : बारलोणी (ता. माढा) येथे संवाद मेळाव्यात शिंदे बंधूंनी हात उंचावून आपल्या एकजुटीचे दर्शन घडविले.**

झाले असे की,आ.बबनदादा शिंदे यांनी यंदा निवडणुकित माघार घेत त्यांचे सुपुत्र तथा सोलापूर जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांना शरद पवार यांच्या पक्षाकडून किंवा अपक्ष म्हणून उभे करण्याचा निर्णय जाहीर केला आहे परंतु सोलापूरच्या साखर कारखानदारींत ज्यांनी आपली मांड पक्की केली आहे ते श्रीविठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी देखील माढा मतदार संघावर लक्ष केंद्रीत केले आहे.कुठल्या पक्षाकडून उभे राहाणार याविषयीचे गूढ त्यांनी अद्याप उलगढलेले नाही. तसेच यंदाच्या गाळपास येणाऱ्या उसाला प्रतिटन तीन हजार रूपयांपेक्षा अधिक भाव देण्याचा निर्णय घेवून पाटलांनी इतर कारखानदारांची झोप उडवली आहे.पाटील हे माढ्यात उभे राहिले तर आ.बबनदादांची चिंता वाढू शकते,असे राजकिय जाणकारांचे मत आहे.

या साऱ्या पार्श्वभूमीवर सोमवारी करमाळा विधानसभा मतदार संघातील बारलोणी,ता.माढा गावातील एका मंगल कार्यालयात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे यांचे सुपुत्र यशवंत शिंदे हे त्याचे आयोजक होते.आ.बबनदादा,त्यांचे बंधू रमेशमालक आणि संजयमामा हे तिघेही मेळाव्याला उपस्थित होते.

आ. बबनदादा शिंदे पुढे म्हणाले की, करमाळा मतदारसंघातील ३६ गावांमध्ये भीमा -सीना जोड कालवा, बोगद्यात दरवाजे बसवण्यात येणार आहेत. सिंचनापासून वंचित गावे मंजुरीसाठी पाठवली आहे. शहरातील तरुण डॉक्टरांनी एकत्र येऊन कुर्डूवाडीत हॉस्पिटल उभे करावे, मी मदतीसाठी तयार आहे. कुर्डूवाडी व टेंभुर्णी लवकरच ट्रामा केअर हॉस्पिटल सुरू होतील. माढा तालुक्यात बीएससी कृषी व डी फार्मसी कॉलेज सुरू केले आहे. कोणतेही विकास काम सुरू केल्यानंतर ठेकेदाराला काम न करून देण्याचे प्रकार वाढले आहेत हेही भविष्यात रोखण्याची गरज आहे.

आ. संजय शिंदे म्हणाले की, 'उपमुख्यमंत्री अजित पवार खंबीर राहिल्याने करमाळा मतदारसंघात मोठा निधी मिळाला. कुर्डूवाडी पाणी पुरवठा निधी मंजूर होईल. सीना-माढा सिंचनाची उर्वरित कामे मंजुरी मिळताच कामे सुरू होतील. यावेळी माजी आमदार विनायक पाटील, अण्णा ढाणे, श्रीपाद दळवी, हर्षल बागल, संतोष कापरे, प्रा. रवींद्र ननवरे, समीर मुलाणी, बापूसाहेब जगताप, वामन उबाळे यांनी मनोगत व्यक्त केले.

### तिघे बंधू एकाच व्यासपीठावर

माढा मतदारसंघात आ. बबनराव शिंदे यांचे पुतणे धनराज शिंदे यांनी चुलत्याच्या विरोधात निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली होती. मात्र, संवाद बैठकीमध्ये आ. बबनराव शिंदे, आ. संजय शिंदे व धनश्रींचे संस्थापक रमेश शिंदे एकाच व्यासपीठावर हात जोडून उभे असल्याने आमचे मिटले असल्याचे यावेळी सर्वांना दाखवून दिले. यामुळे उपस्थित दहा हजार नागरिकांतून एकच चर्चा सुरू झाली.

### ९० टक्के मतदान देणार

माढा मतदारसंघात रणजितसिंह शिंदे माढा मतदारसंघामध्ये आ. बबनराव शिंदे निवडणूक लढणार नसून रणजीतसिंह शिंदे अपक्ष म्हणून निवडणूक लढणार असल्याचे संवाद बैठकीमध्ये स्पष्ट सांगितले. कुर्डूवाडीचे माजी नगराध्यक्ष समीर मुलाणी यांनी आ. संजय शिंदे यांना ९० टक्के मतदान देणार असल्याचे आश्वासन दिले.

धनश्री ग्रुपचे संस्थापक रमेश शिंदे, युवा नेते यशवंत शिंदे, बंडू ढवळे, वामन उबाळे, आप्पासाहेब उबाळे, व्यंकटेश पाटील, सुरेश बागल, समीर मुलाणी, बापूसाहेब जगताप, अण्णासाहेब ढाणे, संजय गोरे, निवृत्ती गोरे, अरुण काकडे, नितीन पवार, शिवाजी चौधरी, प्रदीप सोनटक्के, सूर्यकांत गोरे, श्रीकांत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

### एकाच हारात तिघांची एकी

व्यासपीठावर येताच शिंदे समर्थक सरपंच आणि उपसरपंच यांनी एक भला मोठा हार घातून तिघांचा सत्कार केला.विशेष आनंदाची बाब म्हणजे कार्यालयात येताना कार्यकर्त्यांनी रमेशमालक आणि संजयमामा यांना खांद्यावर घेवून व्यासपीठाव आणले बबनदादा मात्र चालत आले.एकाच हारात तिघांचे दर्शन झाल्याने शिंदे फॅमिलीने यातून एकजुटीचा संदेश दिल्याचे मानले जात आहे.

### अभिजीत पाटलांवर टीकास्त्र

मेळाव्यात झालेल्या भाषणाच्या वेळी बबनदादांनी आक्रमक शैलीत अभिजीत पाटलांवर टीकास्त्र सोडले. 'पंढरपुरातील नेत्याने साखरेचा जो दर देण्याचे ठरवले आहे, तो पाच वर्षे देऊन दाखवा तुमची पाठ थोपटतो,अशा शब्दात त्यांनी पाटलांचे नाव न घेता आव्हान दिले. राज्य शासनाने लाडकी बहीण योजना काढून पंधराशे रुपये दिले तरी महिला मते द्यायला तयार नाहीत आणि तुम्ही साड्या वाटल्याने काय महिला मत देत असतात का?असा सवालही पाटलांना उपस्थित केला.


कल्याण
447-58-350

मुंबई
677-05-140



